विधी महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : एनजीसी २०१७/(१३९/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०८ मार्च, २०१९

**संदर्भः** संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमवि-२०१७/ विधी/ अ.तु.मान्यता/ मवि-२/ ८५५ दिनांक १७.०१.२०१९.

**प्रस्तावनाः**

राज्यातील अशासकीय विधी महाविद्यालयातील ०३ वर्षीय व ०५ वर्षीय विधी अभ्यासक्रम शासन निर्णय दिनांक ११.०३.२०१६ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर शै.व. २०१६-१७ पासून या अभ्यासक्रमासाठीचे प्रवेश गुणवत्तेनुसार विधी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेकरीता नोंदणी करताना काही महाविद्यालयांमध्ये विधी अभ्यासक्रमाची अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठी शासन मान्यतेचे आदेश उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले मात्र सदरच्या अतिरिक्त तुकडीस संबंधित विद्यापीठाने वेळोवेळी संलग्निकरण व भारतीय विधिज्ञ, नवी दिल्ली यांची मान्यता असल्याचेही निदर्शनास आले आहे.

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक १७ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये या खालील नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकडयांना नियमित करण्याची शिफारस केलेली आहे.

विधी महाविद्यालयातील कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांना संबंधित विद्यापीठाने वेळोवेळी दिलेले संलग्निकरण, भारतीय विधिज्ञ, नवी दिल्ली यांनी दिलेली मान्यता, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये सदर अतिरिक्त तुकड्यांचा समावेश करण्यास शासनाने वेळोवेळी दिलेली मान्यता व त्यानुसार प्रवेशित झालेले विद्यार्थी व त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन तसेच संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक १७ जानेवारी, २०१९ अन्वये केलेल्या शिफारशीस अनुसरुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अशा विधी महाविद्यालयातील कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांना कायम विनाअनुदान तत्वावर नियमित मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

विधी महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांना संबंधित विद्यापीठाने दिलेले संलग्निकरण व भारतीय विधिज्ञ, नवी दिल्ली यांची मान्यता, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये सदर अतिरिक्त तुकड्यांचा समावेश करण्यास शासनाने वेळोवेळी दिलेली मान्यता व त्यानुसार प्रवेशित

Pramode Adv.

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai - 400 705.

झालेले विद्यार्थी व त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन व संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक १७ जानेवारी, २०१९ अन्वये केलेल्या शिफारशीनुसार खालील विवरणपत्रात नमूद विधी महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांना त्या सुरु करण्यात आलेल्या वर्षापासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम विनाअनुदान तत्वावर नियमित मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयाने अतिरिक्त तुकडी सुरु केल्याचे वर्ष | तुकडया |
|---|---|---|---|---|
| मुंबई विद्यापीठ, मुंबई | | | | |
| १. | १ | पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे ॲड. बाळासाहेब आपटे कॉलेज ऑफ लॉ, दादर, मुंबई | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| २. | २ | कांदीवली एज्युकेशन सोसायटी, कांदीवली एज्युकेशन सोसायटी लॉ कॉलेज, कांदीवली, मुंबई. | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ३. | ३ | मालाड कांदीवली एज्युकेशन सोसायटीचे मालाड कांदीवली लॉ कॉलेज, मालाड, मुंबई. | शैक्षणिक वर्ष २०१४-१५ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ४. | ४ | चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटरचे कॉलेज ऑफ लॉ, मालाड, मुंबई | शैक्षणिक वर्ष २०११-१२ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ५. | ५ | सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटीचे सेंट विल्फ्रेड कॉलेज ऑफ लॉ, पनवेल, नवी मुंबई | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ६. | ६ | व्हिक्टर दंताज चॅरिटेबल ॲड एज्युकेशन फाऊंडेशनचे व्हिक्टर दंताज लॉ कॉलेज, हसीना मंजील, सिंधूदुर्ग | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ७. | ७ | साऊथ रत्नागिरी डिस्ट्रीक्ट शिक्षण प्रसारक मंडळ, श्री. पंचम खेमराज लॉ कॉलेज, सावंतवाडी, सिंधूदुर्ग | शैक्षणिक वर्ष २०१३-१४ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| ८. | ८ | हबीब एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे एम.एस.कॉलेज ऑफ लॉ, मुंब्रा, ठाणे | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |



PSJ mode A.I.V.

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai - 400 705.

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयाने अतिरिक्त तुकडी सुरु केल्याचे वर्ष | तुकडया |
|---|---|---|---|---|
| ९. | ९ | शाहू शिक्षण संस्था, देवजीभाई हरिया लॉ कॉलेज, कल्याण, ठाणे | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १०. | १० | इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस स्टडीज ॲण्ड रिसर्च आयबीएसएआर स्कूल ऑफ लॉ, दहिवली, ता.कर्जत, जि.रायगड | शैक्षणिक वर्ष २०१३-१४ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ११. | ११ | शाहू शिक्षण संस्था नालंदा कॉलेज ऑफ लॉ, बोरिवली, मुंबई | शैक्षणिक वर्ष २००२-०३ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १२. | १२ | ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीचे ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा, नवी मुंबई | शैक्षणिक वर्ष २०१४-१५ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १३. | १३ | रिझवी एज्युकेशन सोसायटी, रिझवी कॉलेज ऑफ लॉ, बांद्रा, मुंबई | शैक्षणिक वर्ष २००२-०३ | विधी (३ वर्ष) (२ तुकड्या) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १४. | १४ | ओम विद्यालंकार शिक्षण संस्था, अस्मिता कॉलेज ऑफ लॉ, विक्रोळी, मुंबई | शैक्षणिक वर्ष २०१०-११ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १५. | १५ | ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था, संदेश कॉलेज ऑफ लॉ, विक्रोळी, मुंबई | शैक्षणिक वर्ष २०११-१२ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| १६. | १६ | श्री. विले पार्ले केळवाणी मंडळ, प्रविण गांधी कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले, मुंबई | शैक्षणिक वर्ष २००५-०६ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १७. | १७ | रामराव आदिक एज्युकेशन सोसायटीचे पद्मश्री डी.वाय.पाटील लॉ कॉलेज, नेरुळ, नवी मुंबई. | शैक्षणिक वर्ष २००३-०४ (३ वर्ष) शैक्षणिक वर्ष २००४-०५ (५ वर्ष) | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १८ | १८ | जनार्दन भगत शिक्षण संस्था, भागुबाई ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, पनवेल, रायगड. | शैक्षणिक वर्ष २००९-१० | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| १९ | १९ | व्हिक्टर दंताज चॅरिटेबल ॲन्ड एज्युकेशन फाऊंडेशनचे व्हिक्टर दंताज लॉ कॉलेज, हसीना मंजील, सिंधुदूर्ग. | शैक्षणिक वर्ष २०१२-१३ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |



PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयाने अतिरिक्त तुकडी सुरु केल्याचे वर्ष | तुकडया |
|---|---|---|---|---|
| २० | २० | विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे विधी महाविद्यालय, चेंबुर, मुंबई. | शैक्षणिक वर्ष २०१०-११ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| | | **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** | | |
| २१. | १ | मराठवाडा मित्र मंडळाचे, शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे | शैक्षणिक वर्ष २००३-०४ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| २२. | २ | श्री. बालाजी सोसयटीचे, श्री. बालाजी विधी महाविद्यालय, पुणे | शैक्षणिक वर्ष २००३-०४ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| २३. | ३ | श्री. शिवाजी मराठा सोसायटीचे, विधी महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | शैक्षणिक वर्ष २००३-०४ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| २४. | ४ | सिंहगड एज्युकेशन सोसायटीचे, सिंहगड विधी महाविद्यालय, पुणे | शैक्षणिक वर्ष २००३-०४ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| २५. | ५ | मराठा विद्या प्रसारक समाज नाशिकचे, विधी महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक | शैक्षणिक वर्ष २००४-०५ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| | | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** | | |
| २६. | १ | मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे विधी महाविद्यालय, ता.जि. जालना | शैक्षणिक वर्ष २००२-०३ | विधी (३ वर्ष) (२ तुकड्या) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| | | **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** | | |
| २७. | १ | जय जवान जय किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे, शरदचंद्र पवार विधी महाविद्यालय, नांदेड | शैक्षणिक वर्ष २००४-०५ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| २८. | २ | बाल भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे, संत तुकाराम विधी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर | शैक्षणिक वर्ष २०१५-१६ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| २९. | ३ | दयानंद शिक्षण संस्थेचे दयानंद विधी महाविद्यालय, लातूर | शैक्षणिक वर्ष २००४-०५ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |



PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai - 400 705.

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयाने अतिरिक्त तुकडी सुरु केल्याचे वर्ष | तुकडया |
|---|---|---|---|---|
| | | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर | | |
| ३०. | १ | मेहमुदा शिक्षण आणि महिला ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्थेचे, सेंट्रल इंडिया विधी महाविद्यालय, नागपूर | शैक्षणिक वर्ष २००६-०७ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| ३१. | २ | अंकुश शिक्षण संस्थेचे, जी.एच.रायसोनी विधी महाविद्यालय, नागपूर | शैक्षणिक वर्ष २०१५-१६ | विधी (३ वर्ष) (१ तुकडी) |
| | | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | | |
| ३२. | १ | श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती | शैक्षणिक वर्ष २००५-०६ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |
| ३३. | २ | विद्या प्रसारक मंडळाचे, अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ | शैक्षणिक वर्ष २००४-०५ | विधी (५ वर्ष) (१ तुकडी) |

२. **अटी व शर्ती :-**

१. ज्या विधी महाविद्यालयातील अतिरिक्त तुकड्यांना नियमीत मान्यता देण्यात आली आहे त्या महाविद्यालयाने सदर तूकडी ही कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यात आल्याने ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे सादर करावे.

२. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक / कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी.

३. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

४. संबंधित विद्यापीठांनी, वरील विवरणपत्रातील महाविद्यालयांनी प्रकरणपरत्वे नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

३. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या अतिरिक्त तुकड्यांचा नियतकालिक आढावा घेऊन सदर अतिरिक्त तुकड्यांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अतिरिक्त तुकड्यांची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये



PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai - 400 705.

उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३०८१२३८२८८७०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Vasantrao kharke

Digitally signed by Dattatray Vasantrao kharke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d598800beb5ed37ae09d78fff05921827123426c3977a7476478ce183be979d, cn=Dattatray Vasantrao kharke
Date: 2019.03.08 15:00:47 +05'30'

(द.व. खारके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
४) संबंधित संस्था,(विद्यापीठामार्फत)
५) निवड नस्ती (मशि-४).

PRINCIPAL
ORIENTAL COLLEGE OF LAW
Plot No. 3,4,5, Sector - 2,
Sanpada, Navi Mumbai - 400 705.